॥ अल्पारंभ: क्षेमकर:॥

SWS Financial Solutions Pvt. Ltd.
Comprehensive Financial Consultancy & Services

Head Office : 2nd Floor, Mandlik Pride, Jehan Circle,
Near Hotel Curry Leaves, Gangapur Road, Nahik 422013

गवाक्ष
......एक विचारमंच ! आर्थिक साक्षरतेसाठी

# Page 1: गवाक्ष :ऑक्टोबर २०२२: अंक २२

## संपादकीय "।। लक्ष्मीं जातवेदो म आवह ।। "



नमस्कार !! SWS , आर्थिक सल्ला व गुंतवणूक क्षेत्रात, गेली २७ वर्षे कार्यरत आहे. इतक्या वर्षात, संस्थेमार्फत सहा हजारांहूनही अधिक ग्राहकांना गुंतवणूक क्षेत्रातील सेवा उपलब्ध करून दिल्या गेल्या आहेत. सनातन हिंदू धर्मात लक्ष्मी ही वैभव, समृद्धी, संपन्नता,संपत्ती, धन दौलत तसेच सौंदर्य, शांती, सौभाग्य आणि सत्य यांची अधिष्ठात्री देवता आहे. तिला 'श्री' असेही संबोधले जाते. आपल्या घरात, कुटुंबात आणि वैयक्तिक आयुष्यात मनशांतीयुक्त सौख्य, धैर्य, अजातशत्रुत्व, आनंद, सुख, कौटुंबिक सौख्य, उत्तम आरोग्य, ऐश्वर्य, सुरक्षितता, सुसंस्कृतपणा आणि ज्ञान या सगळयाचा समुच्चय असणारी श्रीलक्ष्मी आपल्यालासर्वांनाच हवी आहे.व्यक्ती स्तरावर कदाचित 'श्री' म्हणजे सुख मिळवून देऊ शकणारी साधने असतील किंवा ती साधने ज्या पैशाने खरेदी करता येतात तो पैसा असेल. पण समाज आणि विश्व यांचा विचार करता मुळात 'श्री' म्हणजे माणसाचेच नव्हे तर चराचराचे जगणे शक्य आणि सुकर करणारे सर्व काही आहे. आमच्यासाठी, संस्थेच्या स्थापनेपासून ते आजतागायत असणाऱ्या संपूर्ण कालावधीत, जोडल्या गेलेल्या ग्राहकांसंदर्भात आलेली अनुभव समृद्धी, वैचारिक, भावनिक, नातेसंबंधांमधील श्रीमंती आणि त्यांच्या समाधानातून अर्जित केलेली संतुष्टी, ही देखील लक्ष्मी ठरली आहे.

येणाऱ्या दिपोत्सवाच्या निमित्ताने , या अशाच शुद्ध, पवित्र, लक्ष्मीचे स्मरण, पूजन आपण करूयात ! श्री सूक्तात शेवटी म्हटले आहे – "महालक्ष्मी च विद्महे, विष्णुपत्नी च धीमहि, तन्नो लक्ष्मीः प्रचोदयात् ॥", अर्थात, "आम्ही महालक्ष्मीला जाणतो, विष्णूपत्नीचे ध्यान करतो. ती लक्ष्मी आम्हाला प्रेरणा देवो. लक्ष्मी म्हणजे काय हे जाणून घेण्यासाठी, तिचे ध्यान करण्याची पात्रता अंगी येण्यासाठी तिच्या याच स्वरूपाची कृपादृष्टी तुम्हा-आम्हा सर्वांवर सतत कायम असो", या शुभेच्छा !! हेच दीपावली अभिष्टचिंतन !!

श्री. रघुवीर अधिकारी,

C.E.O.

अल्पारंभा फाऊंडेशन आणि आयाम, नाशिक यांच्या वतीने, २३ सप्टेंबर २०२२ रोजी, सुप्रसिद्ध अर्थतज्ञ् डॉ.श्री.विनायक गोविलकर, यांचे "श्री सूक्त" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यांनी आपल्या ओघवत्या विवेचनातून "श्रीसुक्ताचे" अनेकविध पैलू श्रोत्यांसमोर उलगडले. त्यांच्या "श्री सूक्त" या पुस्तकातील काही विवेचन पुढे देत आहोत.

**लक्ष्मी आणि पैसा**



आपल्या हिंदू संस्कृतीत लक्ष्मी हे ऐश्वर्य आणि संपत्तीचे प्रतीक मानले गेले आहे. लक्ष्मी ही देवता आहे, ती विष्णूची पत्नी आहे. तिची कृपा आपल्यावर असावी अशी सगळयांचीच इच्छा असते. तिला प्रसन्न करून घेण्यासाठी अनेक जण अनेक मार्गांनी प्रयत्न करत असतात. श्री सूक्ताचे पठण हा त्यातीलच एक मार्ग. श्री सूक्ताचा केवळ पाठ करून लक्ष्मी प्रसन्न होईल अशी भाबडी समजूत काहींची असते. अनेकांना 'लक्ष्मी' म्हणजे केवळ 'पैसा' असे वाटते. लक्ष्मी प्रसन्न झाली की भरपूर पैसा मिळेल आणि पैसा मिळाला की सुखी, समाधानी आणि आनंदी जीवन जगता येईल अशी समजूत असते. खरं तर आपल्या कोणालाच केवळ पैसा नको आहे, त्यासोबत अनेक गोष्टी हव्या आहेत. त्यासाठी पैसा लागणारच आहे. पण तो पैसा आपलं साध्य नाही, ते केवळ साधन आहे. प्राचीन काळापासून चालत आलेल्या 'श्री सूक्तात' लक्ष्मीचे स्तवन आहे, वर्णन आहे, तिच्याकडे मागणे आहे. आजच्या जगातील पैसा आणि जीवनातील लक्ष्मी या बाबत आपली दृष्टी स्पष्ट करणारे हे सूक्त, स्तोत्र आहे. पैसा आणि श्री किंवा लक्ष्मी यातील भेद समजणे आणि पैशासाठी पळापळ की लक्ष्मीची उपासना याचा विचार आपल्या मनात यायला हवा. म्हणून श्रीसूक्तात मागणे मागितले आहे - "हे देवी लक्ष्मी माते, भगवान विष्णूंसह तुझा अखंड निवास माझ्या घरात, वास्तूत असावा. तुझ्या कृपेने अनारोग्य, कर्ज, दारिद्र्य, अपयश यांचा कायमचा नाश व्हावा.माझ्या समस्त कुटुंबीयांना आरोग्य संपन्न, दीर्घायुष्य, धन संपत्ती, ऐश्वर्य, सुयश, ज्ञान आणि सौख्ययुक्त शांतीचा चिरकाल लाभ होवो."

माणूस आणि समाज यांच्या अस्तित्वासाठी, विस्तार आणि विकासासाठी आवश्यक असणा-या संपत्तीस लक्ष्मी म्हणायला हवे.

**व्यक्ती स्तरावर लक्ष्मी म्हणजे काय ?**

श्री सुक्ता मध्ये म्हटले आहे -

**पुत्र पौत्रम् धनं धान्यं हस्त्यश्वादि गवेरथम् ।**

**प्रजानां भवसि माता आयुष्मन्तं करोतु मे ॥२०॥**

हे देवी तू सर्व प्रजेची माता आहेस. मला मुले, नातवंडे, धन, धान्य, हत्ती, घोडे आणि रथ दे. थोडक्यात काय तर शेतीवाडी, पशुधन, धान्य, पुत्र, पौत्र, सेवक, आप्तेष्ट, राज्य अशी सर्व प्रकारची इहलोकीची लौकिक समृद्धी आणि तिचा मनसोक्त उपभोग घेता यावा म्हणून आरोग्यपूर्ण दीर्घ आयुष्य हे सारे 'श्री' मध्ये अनुस्यूत आहे. केवळ लौकिक संपत्ती असावी असे नाही तर तिचा उपभोग घेण्यासाठी निरामय आणि दीर्घ आयुष्यही हवे.

**समाज स्तरावर लक्ष्मी म्हणजे काय ?**

**धनं अग्निः धनं वायुः धनं सूर्यो धनं वसुः ।।**

**धनं इन्द्रो बृहस्पतिः वरुणं धनमस्तु मे ॥ २१॥**

अग्नी धन आहे, वायू धन आहे, सूर्य धन आहे, पृथ्वी ( जमीन) धन आहे, इंद्र आणि बृहस्पती धन आहेत आणि वरूण ( पर्जन्य) धन आहे. ही सर्व धनरूपे म्हणजे श्री रूपे आहेत. ते धन प्राप्त होण्यासाठी या सूक्तात प्रार्थना आहे. मुळात 'श्री' म्हणजे माणसाचेच नव्हे तर चराचराचे जगणे शक्य आणि सुकर करणारे सर्व काही आहे. ? या चराचराच्या अस्तित्वासाठी अग्नी, वायू, सूर्य,पृथ्वी, पर्जन्य आवश्यक नाहीत का ? या पाच गोष्टींना आपण पंचमहाभूते म्हणतो. . सुखी संपन्न आणि आरोग्यपूर्ण जीवनासाठी ही पंचमहाभूते 'लक्ष्मी' स्वरूप आहेत, तेच खरे धन आहे.

थोडक्यात ऐहिक जीवनाचे सुख केवळ सोन्या नाण्याच्या रूपात न बघता सुख साधनांच्या स्वरूपात व सर्व परिवार आणि पर्यावरण यात पाहून विशाल दृष्टीचा प्रत्यय, श्री सूक्ताने दिलेला आहे.

- डॉ.श्री.विनायक गोविलकर

**Page 3 (Photos and Information)**





"आझादी का अमृत महोत्सव" , या निमित्ताने , भारतीय प्रतिभूती आणि विनिमन्य बोर्ड अर्थात SEBI आणि राष्ट्रीय प्रतिभूती बाजार संस्थान अर्थात NISM यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, निबंध लेखन स्पर्धेत, SWS च्या ट्रेनिंग हेड, डॉ. रुपाली कुलकर्णी, यांना मराठी विभागात , राष्ट्रीय पातळीवर प्रथम पारितोषिक (रु, २५,०००/-) मिळाले

संस्थेमार्फत , विविध संस्था / महाविद्यालये येथे, "अर्थ साक्षरता अभियान" राबविण्यात येते. अशाच काही व्याख्यानांची क्षणचित्रे ...









**Last Page Single Column**

आमच्या बद्दल, थोडेसे....

SWS: आमचा प्रवास

आर्थिक सल्ला व गुंतवणूक क्षेत्रातील आमचा प्रवास १९९५ पासून सुरु आहे. या क्षेत्रातील सर्व सेवा, ग्राहकांना एकाच छत्राखाली उपलब्ध व्हाव्यात, या उमद्या हेतूने संस्थेचा चा प्रवास सुरु झाला. सोपी , ग्राहकाभिमुख, पारदर्शी आणि विश्वासाहार्य सेवा ही आमची वैशिष्टये असून आज संस्था व्यावसायिक उत्कृष्टतेचे प्रतीक म्हणून ओळखली जाते आहे. जोडल्या गेलेल्या ग्राहकांना आर्थिक साक्षरतेकडून, आर्थिक स्वातंत्र्यापर्यंत नेण्यासाठी, आमची अनुभवसंपन्न टीम, सदैव प्रामाणिकपणे कार्यरत आहे !

आमच्या सेवा:

- आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आवश्यक असणाऱ्या गुंतवणूक सेवा ( जन्म, शिक्षण, विवाह, सेवानिवृत्ती,वारसाहक्क इ.: म्युच्यअल फंड्स, इक्विटी मार्केट, कॉर्पोरेट फिक्सड डिपॉसिट्स इ. )
- जीवन विमा, वाहन, आरोग्य आणि अपघात विमा
- करनियोजन आणि कर्ज सेवा
- व्यवसाय किंवा इतर विशिष्ट उद्देशासंदर्भात गुंतवणूक सेवा

आमची वैशिट्ये:

- सेबी अधिकृत गुंतवणूक सल्लागार
- २७ वर्षांचा प्रदीर्घ, संपन्न अनुभव.
- इंजिनीअरिंग, चार्टर्ड अकौंटन्सी, CFA, CFP सारखी पार्श्वभूमी असणारी, अनुभवी आणि कार्यक्षम सल्लागारांची टीम
- विश्वासाहार्य आणि निःपक्षपाती सल्ला
- वैयक्तिक तसेच संपूर्ण कौटूम्बिक, व्यवसाय, विश्वस्थ संस्था यांना सेवा देण्याचा संपन्न अनुभव
- सोपा, ग्राहकाभिमुख, पारदर्शी आणि नैतिक व्यवहार
- पुणे, मुंबई , नागपूर, वर्धा आणि इतर उदोयन्मुख शाखा




**Website: www. swsfspl.com :** **Blog : https://swsfspl.blogspot.com/**